MHST010020622025

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ५६/२०२५ मधील निशाणी क्र.१ खालील आदेश.**

(दिनांक ०६.०३.२०२६ रोजी घोषीत)

स्नेहा मनन जोशी. ...... अर्जदार

विरुध्द

मनन परमानंद जोशी व.४. ...... सामनेवाला

अर्जदारांतर्फे वकील. – श्री. पी.डी.पाटील.

सामनेवाला क्र.१ ते ४ – एकतर्फा.

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४४८ अन्वये वेगवेगळ्या न्यायालयात प्रलंबित असलेली प्रकरणे एकाच न्यायालयात वर्ग होवून चालण्यासाठी दिलेला आहे.

२. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जामध्ये असे कथन केले आहे की, २रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कराड यांचे न्यायालयात प्रलंबित असलेला रे.फौ.ख.क्र.२६१/२०२३ आणि ५वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कराड यांचे न्यायालयात प्रलंबित असलेले P.W.D.V.क्र.६१/२०२३ हे खटले एकमेकांशी निगडीत असून सध्या वेगवेगळ्या न्यायालयात प्रलंबित आहेत. तथापी परस्पर विरोधी निर्णय टाळण्यासाठी सदरील खटले एकाच न्यायालयात वर्ग करण्यात यावेत.

३. सामनेवाला क्र.१ ते ४ यांचेवर नोटीसची बजावणी होऊनही त्यांनी प्रस्तुत कामी हजर होऊन म्हणणे सादर केले नाही. सबब, त्यांचेविरुद्ध अर्ज एकतर्फा चालणेबाबतचा आदेश पारीत करणेत आला.

४. अर्जदार यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करता सदरील प्रकरणे परस्पर विरोधी असल्याचे दिसून येते. तथापी, परस्पर विरोधी निर्णय टाळण्यासाठी सदरील खटले एकाच न्यायालयात निकाली होणेकरीता वर्ग करणे न्यायोचित वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आ दे श**

०१. फौ.कि.अर्ज क्र. ५६/२०२५ मंजूर करण्यात येत आहे.

०२. ५वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कराड यांचे न्यायालयात प्रलंबित असलेले P.W.D.V.क्र.६१/२०२३ हे प्रकरण २रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कराड यांचे न्यायालयात चालण्यासाठी व कायद्याप्रमाणे निकाली करण्यासाठी वर्ग करण्याचे आदेश देण्यात येत आहेत.

०३. प्रस्तुतची प्रकरणे पुन्हा वेगळी होणार नाहीत याची संबंधीतांनी काळजी घ्यावी.

०४. संबंधीत न्यायालयांना वरील आदेश कळविण्यात यावा.

ARVIND WAGHMARE
Digitally signed by ARVIND WAGHMARE
Date: 2026.03.06 18:03:08 +0530

(अरविंद शं. वाघमारे)
सत्र न्यायाधीश, सातारा.

दिनांकः ०६.०३.२०२६

---